आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषी विद्यापीठांना सहायक अनुदान योजनेसाठी निधी वितरण.
(लेखाशीर्ष २४०१ ८२९१)
बाब क्र.३६-सहायक अनुदाने (वेतन)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आविवि-२०२५/ प्र.क्र.१७९/ कार्यासन-९
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०४ जानेवारी, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.२९ जानेवारी,२०२६
२) कृषी व प.दु.म. विभाग नस्ती क्रमांक :- मफुवि-१४२५/प्र.क्र.६१/७ अे.
३) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२५/ प्र.क्र.०२/ कार्यासन- ६ दि.५ मे,२०२५ व १७ जुलै,२०२५ व दि.१६/०९/२०२५
४) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्रमांकः आविव-२०२५/ प्र.क्र.१७९/ कार्यासन-९ दि.२१ नोव्हेंबर,२०२५

प्रस्तावना :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत कृषि विभागामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या कृषी विद्यापीठांना सहायक अनुदान या योजनेंतर्गत लेखाशिर्ष २४०१ ८२९१ अंतर्गत ३६-सहायक अनुदाने (वेतन) करीता निधी मागणीचा प्रस्ताव वाचा मधील अ.क्र.२ अन्वये कृषी व प.दु.म.विभागाकडून आदिवासी विकास विभागास प्राप्त झाला होता. वित्त विभागाच्या वाचा मधील अ.क्र. १ मधील शासन परिपत्रकानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर लेखाशिर्ष २४०१ ८२९१ अंतर्गत ३६-सहायक अनुदाने (वेतन) करीता उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी कृषी व प.दु.म.विभागाने मागणी केलेला निधी कृषी व प.दु.म. विभागास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील मुख्य लेखाशीर्ष २४०१, पीक संवर्धन या मुख्य लेखाशीर्षाखाली कृषी विद्यापीठांना सहायक अनुदान या योजनेंतर्गत बाब क्र.३६-सहायक अनुदाने (वेतन) या बाबीखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदींतून खालीलप्रमाणे निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रु.लक्ष)

| योजनेचे नाव | लेखाशिर्ष | बाब | सन २०२५-२६ मधील अर्थसंकल्पीय तरतूद | सन २०२५-२६ मध्ये आतापर्यंत वितरित केलेला निधी | सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| कृषी विद्यापीठांना सहायक अनुदान | २४०१ ८२९१ | ३६- सहायक अनुदाने (वेतन) | ५००.०० | ३१५.०० | १००.०० |
| | **एकुण** | | **५००.००** | **३१५.००** | **१००.००** |

२. उपरोक्तप्रमाणे **एकूण रु.१००.०० लक्ष (अक्षरी एक कोटी फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव, कृषि विभाग** यांना अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना नियंत्रक अधिकारी यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम तसेच वित्त विभागाच्या वाचा मधील अ. क्र.१ येथील च्या शासन परिपत्रकांतील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदींतून नियंत्रक अधिकारी यांनी झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय/उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र इ. माहिती आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या वाचा मधील अ. क्र.१ येथील शासन परिपत्रकांतील तरतुदींस अनुसरुन व वित्त विभागाने प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरित करण्यात येत आहे त्याच प्रयोजनासाठी निधी खर्च होईल याची जबाबदारी संबधित प्रशासकीय विभागाची राहील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२६०२०४११२०५५६१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SATISH VITHALRAO KOVE

Digitally signed by SATISH VITHALRAO KOVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CE18732734BA0742D7712775E8F0AD400558E8748375399762FD447C3E9AC1EB, cn=SATISH VITHALRAO KOVE
Date: 2026.02.04 11:22:14 +05'30'

**(सतीश कोवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
८. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९/ व्यय १४ ), मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०.नियंत्रक,महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहूरी
११.कार्यासन क्र. ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१२.निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.